# जाहिरातीचा नमुना

## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सातारा कडील केंद्र पुरस्कृत योजनांचे सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षासाठी लेखापरिक्षण करणेसाठी आठ सनदी लेखापाल असलेले एक पॅनल मा.सचिव ग्रामविकास यांचे मान्यतेने करावयाचे आहे. तरी संबंधित सनदी लेखापाल यांचेकडून खालील अटी व शर्तीनुसार अर्ज मागविणेत येत आहेत :-

१. लेखा परिक्षणाचे शुल्क खालील प्रमाणे आकारण्यात यावे :-

१. रुपये ५० कोटी पर्यंत खर्च असणा-या यंत्रणा कार्यालयासाठी रुपये ५० हजार.
२. रुपये ५०,००,००,००१ ते ७५,००,००,००० पर्यंत खर्च असणा-या यंत्रणा कार्यालयासाठी रुपये ६० हजार.
३. रुपये ७५,००,००,००१ पासून पुढील खर्च असणा-या यंत्रणा कार्यालयांसाठी रुपये ७०हजार.

२. वर नमुद केलेल लेखापरिक्षणाचे शुल्क या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क/कर इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

३. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या लेखापरिक्षणामध्ये गट पातळीवरील लेख्यांचा लेखापरिक्षणामध्ये समावेश राहील.

४. लेखापरिक्षण अहवाल जिल्हा ग्रामीण विकास कार्यालयास विहित मुदतीत सादर करण्यात यावा. मुदतीत अहवाल ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयास सादर न झाल्यास दंड वसूल करणे, तसेच लेखापरिक्षणासाठी निश्चीत केलेल्या शुल्काव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क/कर इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत. यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाबरोबर लेखी करार करावा लागेल.

५. या जाहिराती संबंधी योजने संदर्भात अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालय, सातारा यांचेकडे संपर्क साधण्यात यावा.

**इच्छुक सनदी लेखापालांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सातारा यांचेशी संपर्क साधुन आपले विहित नमुन्यातील प्रस्ताव/अर्ज संबंधीत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे दिनांक २४/०२/२०२० पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत. सदर प्रस्ताव/अर्ज विभागीय आयुक्त कार्यालयाकडे परस्पर पाठवू नये, पाठविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.**

अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
सातारा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
सातारा जिल्हा परिषद, सातारा